दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

धन म्हणजे फक्त पैशांची मोजदाद नाही; तर सदाचार, मेहनत, ज्ञान, विश्वास, आणि माणुसकी यांचा संगम म्हणजे खरे धन, जे कधीही संपत नाही आणि आयुष्य समृद्ध करते.

## सुदामेला ५० हजारांचा दंड

**पुणे :** इन्फ्ल्यूएन्सर अथर्व सुदामे याने विनापरवानगी पीएमपी बसमध्ये रील्स व्हिडीओ केला. यासोबतच त्याने वाहकाचा गणवेश परिधान करत, बॅच बिल्ला आणि ई-तिकीट मशीनचा वापर केला. त्यामुळे पीएमपी प्रशासनाने सुदामेला आता 50 हजारांचा दंड केला आहे. हा दंड न भरल्यास माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत थेट गुन्हा दाखल करणार असल्याचे नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे. चालक वाहकांनाही यासंबंधी सूचना केली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ९ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १०७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### बेकायदेशीर कपडा युनिट उद्ध्वस्त

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी पश्चिम दिल्लीतील बनावट ब्रँडेड कपड्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या एका बेकायदेशीर कपड्यांचे उत्पादन आणि साठवणूक युनिटचा पर्दाफाश केला आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. पश्चिम दिल्लीत बनावट कपड्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आणि विक्री होत असल्याचा आरोप कॅल्विन क्लेन, झारा, टॉमी हिलफिगर, लेव्ही स्ट्रॉस अँड कंपनी आणि यूएसपीए यासारख्या अनेक जागतिक कंपन्यांनी केली होती.

### माकपा नेत्याच्या हत्येप्रकरणी जन्मठेप

**कन्नूर (केरळ) :** येथील थलासेरी येथील न्यायालयाने गुरुवारी २००८ मध्ये माकपच्या स्थानिक नेत्याच्या हत्येप्रकरणी सात आरएसएस-भाजप कार्यकर्त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश विमल जे यांनी सुमित उर्फ कुट्टन, केके प्रजेश बाबू, बी निधिन, के सनल, स्मिजोश, सजीश आणि व्ही जयेश यांना दोषी ठरवले.

### पोलिस उपनिरीक्षकाला भरधाव ट्रकने चिरडले

**बांका :** बिहारच्या बांका जिल्ह्यात कर्तव्यावर असताना एका उपनिरीक्षकाचा (एसआय) वेगाने येणाऱ्या ट्रकने चिरडून मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृताचे नाव पुरेंद्र कुमार सिंग (एसआय) असे आहे, ते पंजवारा पोलिस ठाण्यात तैनात होते. रात्री पुरेंद्र कुमार सिंह इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांसह ड्युटीवर असताना आणि वाहनांची तपासणी करत असताना धुरिया चौकात ही घटना घडली. सिंग यांनी एका वेगाने येणाऱ्या ट्रकला थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा चालकाने गाडीने एसआयला चिरडले.

## रशियाकडून ऊर्जा आयात सुरू ठेवल्याने निर्णय

# भारतावर ५०० टक्के अमेरिकी शुल्क?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी पाठिंबा दिल्यानंतर रशियन ऊर्जा आयात करणाऱ्या देशांवर कठोर आर्थिक कारवाई करण्याचा अमेरिकन काँग्रेसमधील प्रस्ताव पुन्हा चर्चेत आला आहे. या प्रस्तावित विधेयकानुसार रशियाकडून तेल, वायू, युरेनियम आणि अन्य ऊर्जा-संबंधित उत्पादने खरेदी करणाऱ्या देशांवर तब्बल ५०० टक्क्यांपर्यंत दंडात्मक शुल्क तसेच दुय्यम निर्बंध लादण्याचा अधिकार अमेरिकेला मिळू शकतो.**



या उपाययोजनांचा थेट फटका भारत आणि चीनसारख्या देशांना बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्राहम यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी व्हाईट हाऊसमध्ये अध्यक्ष ट्रम्प यांची भेट घेतली. या भेटीत ट्रम्प यांनी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रशियावरील निर्बंधांच्या कायद्याला तत्त्वतः मान्यता दिल्याचे ग्राहम यांनी सांगितले.

ग्राहम यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, युक्रेन शांततेसाठी सवलत देत आहे, मात्र रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन केवळ वेळकाढूपणा करत असून निष्पाप नागरिकांचे बळी घेत आहेत. त्यामुळे हा कायदा योग्य वेळी आणला जात आहे. रशिया सँक्शन्स ॲक्ट, २०२५ नावाचे हे द्विपक्षीय विधेयक सिनेटर लिंडसे ग्राहम आणि डेमोक्रॅटिक सिनेटर रिचर्ड ब्लूमेंथल यांनी संयुक्तपणे मांडले आहे.

या प्रस्तावित कायद्याचा उद्देश रशियाच्या लष्करी कारवायांसाठी वापरल्या जाणाऱ्या आर्थिक स्रोतांवर घाव घालणे हा आहे. विशेषतः ऊर्जा निर्यातीमधून मिळणारे उत्पन्न हे रशियासाठी मोठे आर्थिक बळ ठरले असून, पाश्चात्य देशांनी आधीच लादलेल्या निर्बंधांनंतरही ही कमाई तुलनेने स्थिर राहिली आहे, असा समर्थकांचा दावा आहे.

यापूर्वी व्हाईट हाऊसने या पॅकेजमध्ये राष्ट्रपतींना अधिक लवचिकता देणाऱ्या तरतुदी असाव्यात, अशी भूमिका घेतली होती. या विधेयकातील तरतुदींनुसार, अमेरिकन अध्यक्षांनी असा निष्कर्ष काढला की रशियन सरकार किंवा त्यांचे प्रतिनिधी युक्रेनशी शांतता करार करण्यास नकार देत आहेत, विद्यमान करारांचे उल्लंघन करत आहेत, नवीन आक्रमण सुरू करत आहेत किंवा युक्रेन सरकारला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर निर्बंध आपोआप लागू होतील. त्यात रशियन राष्ट्राध्यक्ष, वरिष्ठ लष्करी अधिकारी तसेच रशियन सैन्याला जाणूनबुजून मदत करणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तींवर व्हिसा बंदी आणि मालमत्ता गोठवण्याच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. भारताला याचा फटका बसणार आहे.

## पुराव्यांच्या देवाणघेवाणीवरून न्यायालयात खडाजंगी

### संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी पुढे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या या बहुचर्चित प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे. या हत्याकांड प्रकरणी गुरुवारी (8 जानेवारी) बीड येथील विशेष मकोका कोर्टात झाली. या सुनावणीत पुराव्यांची देवाणघेवाण, आरोपींचे अर्ज आणि तांत्रिक कागदपत्रांवरून जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता 23 जानेवारी 2026 रोजी होणार आहे. या प्रकरणातील महत्त्वाचे डिजिटल पुरावे असलेले पेन ड्राईव्ह सर्व आरोपींना उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश कोर्टाने दिले आहेत. पुराव्यांच्या पारदर्शकतेसाठी ही मागणी आरोपी पक्षाकडून करण्यात आली होती. त्यावर कोर्टाने आरोपींना पेन ड्राईव्ह देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर लॅपटॉपची क्लोन कॉपी आणि तपासी अधिकाऱ्यांचे म्हणणे आरोपी पक्षाने पुराव्याचा भाग म्हणून लॅपटॉपची 'क्लोन कॉपी' मिळावी, अशी मागणी कोर्टासमोर केली. यावर तपासी अधिकारी आणि सरकारी पक्षाने आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितला असून, येत्या 15 कार्यालयीन दिवसांत यावर लेखी उत्तर सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. या पुराव्यांच्या यादीवर आता आरोपी पक्षाला आपले म्हणणे मांडायचे असून, कोर्टाने त्यांना तशा सूचना दिल्या आहेत.

## अर्ज फेटाळलेल्या उमेदवारांना पुन्हा संधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पुढील आठवड्यात होणारी मुंबई महापालिका निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक उमेदवारांसाठी एक आशेचा किरण निर्माण झाला आहे. विविध कारणास्तव फेटाळण्यात आलेल्या या उमेदवारांचे अर्ज पुन्हा दाखल करून घेण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे याचिकेतील मागण्या आणि याचिकेवर तातडीच्या सुनावणीची गरज लक्षात घेऊन न्यायालयानेही या याचिकेवर शुक्रवारी तातडीची सुनावणी ठेवली आहे.

विभाग क्रमांक १ ते २२७ चे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या महापालिका आयुक्तांनी या उमेदवारांचे अर्ज विविध कारणांस्तव फेटाळले होते. तथापि, सत्ताधारी पक्षाला खूश करण्यासाठी हे अर्ज फेटाळले असावेत, असा संशय याचिकाकर्त्यांनी याचिकेत उपस्थित केला आहे. त्याचप्रमाणे, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दिलेली ७ दिवसांची मुदत कमी असल्याचा दावा देखील केला आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही याचिका सादर करण्यात आली तेव्हा न्यायालयाने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली व प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले. वांद्रे पूर्व येथील मोझम अली मीर यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे.

## अधिकाऱ्यांकडून संस्था चालक शिक्षकांच्या मानगुटीवर चौकशीचे भूत

# टप्पा अनुदानाची राज्यात चौकशीचे आदेश!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** खासगी प्राथमिक - माध्यमिक शाळा, मुन्ना तुकडी वाढ आणि २०, ४०, ६० आणि ८० टक्के टप्पा अनुदान दिले गेले, अशा राज्यातील ३६ जिल्हे आणि एका उपनगरातील माध्यमिक व प्राथमिक शाळांची चौकशी करण्याचे निर्देश राज्य शासनाने एका आदेशाद्वारे काढले असून, शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले गेले असल्याने चौकशीचे हे भूत संस्था चालक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानगुटीवर बसले आहे. बीड जिल्ह्यातील शाळांची तपासणी आणि चौकशी जालना जिल्ह्यातील अधिकारी करणार आहेत.



राज्यातील मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, बीड, लातूर या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक भरती घोटाळा झाला आहे. शालार्थ आयडी यु-डायस क्रमांक यांसह अनेकांनी याचा गैरवापर केला असून, कोणतीही परवानगी नसताना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली गेली. शासनाने २००१ मध्येच ही प्रक्रिया बंद केलेली असताना मागील कागदपत्रे दाखवून संस्थाचालकांनी लाखो रुपये घेत भरती केल्याचा आरोप काहींनी केला होता, मात्र राज्य शासनाने आता पुन्हा एकदा चौकशीचे आदेश नव्याने काढले आहेत.

२५ ऑगस्ट रोजीच्या शासन आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश २ जानेवारी रोजी नवीन आदेश राज्यातील सर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना काढले आहेत. राज्यातील २० टक्के ४० टक्के ६०% आणि ८० टक्के शाळा अनुदानाची नव्याने चौकशी आणि तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये वर्ग, तुकड्या, शिक्षक भरती, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती आदींची चौकशी केली जाणार. यामध्ये ज्या ठिकाणी शाळेला मान्यता दिली शाळा त्याच ठिकाणी आहे का, यु-डायस क्रमांक आहे का, त्या शाळेला मान्यता आहे का, टप्पा अनुदान मंजूर शिक्षक कर्मचाऱ्यांना मिळतो का, विद्यार्थ्यांची संख्या, वर्ग तुकड्यांची संख्या, वैयक्तिक मान्यता, आवक - जावक रजिस्टर आहे का, शालार्थ आयडी मान्यता आदेश आहेत का, आरक्षणाचे धोरण पालन केले आहे का, बायोमेट्रिक पद्धतीने विद्यार्थ्यांची हजेरी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे चेहरा ओळख नोंद आहे का, टप्पा अनुदानात संबंधित कर्मचारी यांना देयके देण्यात येतात का, या संदर्भातील सर्व चौकशी केली जाणार आहे. ३६ जिल्ह्यांसह मुंबई या उपनगरामध्ये देखील चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यातील शाळांची तपासणी ही जालना जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी आणि वेतन पथक अधीक्षक यांनी करण्याचे आदेश आहेत. त्यामुळे आता संस्थाचालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शालार्थ आयडी, यु-डायस क्रमांक कोणतीही परवानगी न घेता केलेल्या भरती संदर्भात पथकाने केलेल्या चौकशीमध्ये नागपूर विभागात ६३२ शिक्षक दोषी आढळले आहेत. शालार्थ आयडी बनावट असल्याचेही निदर्शनास आले असल्याचे राज्याचे माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक महेश पालकर यांनी म्हटले आहे.


## पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांचे निधन

### गाडगीळ आयोग पर्यावरणीय धोरणांचा केंद्रबिंदू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पद्म पुरस्कारांनी सन्मानित, जागतिक कीर्तीचे पर्यावरणशास्त्रज्ञ आणि विचारवंत प्रा. माधव गाडगीळ यांचे बुधवारी, ७ जानेवारी रोजी रात्री उशिरा पुण्यात निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. वयोमानानुसार उद्भवलेल्या विविध आजारांमुळे त्यांची प्रकृती काही काळापासून खालावली होती. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण संशोधन, धोरणनिर्मिती आणि लोकाभिमुख विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

२४ मे १९४२ रोजी पुण्यात जन्मलेले माधव गाडगीळ हे भारतीय पर्यावरणशास्त्रातील एक अत्यंत प्रभावी आणि दूरदृष्टीचे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. प्रारंभिक शिक्षण पुण्यात पूर्ण केल्यानंतर, त्यांनी मुंबईत एमएससीचे शिक्षण घेतले आणि पुढे हार्वर्ड विद्यापीठातून पीएचडी पदवी



संपादन केली. त्यांचा लोकसंख्या जीवशास्त्र आणि पर्यावरणीय अभ्यासाकडे विशेष ओढा होता.

भारतात परतल्यानंतर त्यांनी बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे सेंटर फॉर इकोलॉजिकल सायन्सेसची स्थापना केली. या केंद्राच्या माध्यमातून पर्यावरणशास्त्राला शैक्षणिक आणि संशोधनाच्या पातळीवर नवे परिमाण मिळाले. लोकसंख्या जीवशास्त्र, संवर्धन जीवशास्त्र, मानवी पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरणीय इतिहास या क्षेत्रांत त्यांनी केलेले संशोधन देश-विदेशात मान्यतेस पात्र ठरले. २०१० साली केंद्र सरकारने पश्चिम घाटांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या पश्चिम घाट इकोलॉजी एक्सपर्ट पॅनेलचे अध्यक्षपद गाडगीळ यांनी भूषवले. पुढे हेच पॅनेल 'गाडगीळ आयोग' म्हणून ओळखले गेले. या अहवालातील शिफारशी कर्नाटकसह काही दक्षिण भारतीय राज्य सरकारांनी अंमलात आणल्या नाहीत, तरीही तो अहवाल पर्यावरणीय धोरणांवरील चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. ते पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे सदस्य होते. जैवविविधता कायद्याचा मसुदा तयार करण्यात तसेच वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीत त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक समुदायांचे हक्क यांचा समतोल साधण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला.

संशोधक म्हणून त्यांनी २५० हून अधिक वैज्ञानिक शोधनिबंध प्रकाशित केले. विशेष बाब म्हणजे त्यांचे लेखन केवळ इंग्रजीपुरते मर्यादित न राहता अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाले.

## अन्यायाला आव्हान देणे हेच वकिलांचे कर्तव्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** न्यायव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून वकिलांनी नेहमी सत्तेला सत्य सांगण्याचे धैर्य ठेवले पाहिजे. अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहणे आणि समाजातील आवाज नसलेल्या घटकांच्या हक्कांसाठी लढणे, हीच बारची खरी भूमिका आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे यांनी केले.

मुंबई उच्च न्यायालयातून निरोप घेताना आयोजित समारंभात त्या बोलत होत्या. आपल्या कार्यकाळात न्यायमूर्ती मोहिते-ढेरे यांनी अनेक संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये निर्भीड भूमिका घेतली. न्यायालयीन स्वातंत्र्य, नागरिकांचे मूलभूत हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि घटनात्मक मूल्यांचे संरक्षण यासाठी त्यांनी सातत्याने ठाम भूमिका मांडली. न्यायमूर्ती मोहिते-ढेरे यांनी आपल्या भाषणात वकिलांची जबाबदारी अधोरेखित करताना



सांगितले की, न्यायप्रक्रियेत बार आणि बेंच यांचे नाते अत्यंत महत्त्वाचे आहे. वकिलांनी न्याय, सत्य आणि संविधानिक मूल्ये जपण्याचे भान ठेवले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. न्यायमूर्ती, ज्येष्ठ वकील, बार असोसिएशनचे पदाधिकारी आणि न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. अनेक वक्त्यांनी त्यांच्या न्यायनिष्ठा, स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीड निर्णयांची प्रशंसा केली. न्या. रेवती मोहिते-ढेरे यांच्या कार्यकाळाने मुंबई उच्च न्यायालयाच्या इतिहासात न्यायालयीन धैर्य, मूल्याधिष्ठित निर्णय आणि मानवतावादी दृष्टिकोन यांची छाप उमटवली आहे, असे मत व्यक्त करण्यात आले.

## रोहित पवार घड्याळाच्या प्रचारात

### अजित पवारांसोबत पुण्यातून भाजपवर हल्लाबोल होणार?

दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात महत्त्वाची घडामोड घडत आहे. खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांच्या प्रचारातील भूमिकेबाबत सुरू असलेल्या चर्चांना आज पूर्णविराम मिळताना दिसत आहे. आजपासून आमदार रोहित पवार हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात सक्रिय होत आहेत. त्यामुळे 'घड्याळ' आणि 'तुतारी वाजवणारा माणूस' या दोन्ही चिन्हांचा प्रचार एकत्र पाहायला मिळणार असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

माध्यमांसोबत संवाद साधताना अजित पवार यांनी लवकरच सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि निलेश लंके हे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या



प्रचारात दिसतील, असे स्पष्ट संकेत दिले होते. त्यानुसार आजपासून रोहित पवार प्रचारात उतरत असून, ते अजित पवारांसोबत संयुक्तपणे प्रचार फेऱ्या मारणार आहेत. आतापर्यंत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या असल्या, तरी प्रमुख नेते एकाच व्यासपीठावर न दिसल्याने संभ्रम निर्माण झाला होता. मात्र आता रोहित पवारांच्या सहभागामुळे हे चित्र स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार यांनी पुणे व पिंपरी-चिंचवडमधील भाजप नेतृत्वावर जोरदार टीका सुरू केली आहे. विकासकामे, स्थानिक प्रश्न आणि सत्तेचा गैरवापर या मुद्द्यांवरून भाजपवर हल्लाबोल करण्यात येत आहे. त्यामुळे आजच्या प्रचारात रोहित पवारही भाजपला लक्ष्य करणार का, अजित पवारांच्या भूमिकेला पाठिंबा देत आक्रमक भूमिका घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याच्या चर्चांवर अजित पवार यांनी सूचक भूमिका मांडली आहे. "सध्या निवडणुकांची धामधूम सुरू आहे. उमेदवार निवड, प्रचार, संघटन यामध्येच वेळ जातोय. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत सध्या विचार केलेला नाही.

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

# आरक्षणाची सवलत घेतली की 'ओपन'चा रस्ता बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आरक्षण व्यवस्थेबाबत आणि खुल्या प्रवर्गातील संधींबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण, स्पष्ट आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे सरकारी भरती प्रक्रियेत आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी कोणत्या टप्प्यावर आणि कोणत्या स्वरूपाची सवलत घेतली आहे, याला निर्णायक महत्त्व प्राप्त झाले आहे. न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे की, जर एखाद्या उमेदवाराने भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर आरक्षित प्रवर्गाची सवलत (जसे की कमी कट-ऑफ, वयोमर्यादा, गुणांची सवलत इ.) घेतली असेल, तर त्या उमेदवाराला पुढे खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा करता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने दिलेल्या या निकालात असे नमूद करण्यात आले की, अंतिम गुणवत्ता यादीत आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराचे गुण सामान्य प्रवर्गातील उमेदवारांपेक्षा जास्त असले, तरीही त्याचा विचार फक्त आरक्षित जागेसाठीच केला जाईल. केवळ गुणवत्तेच्या आधारे अंतिम टप्प्यावर स्वतःची ओळख बदलून खुल्या प्रवर्गात प्रवेश मिळवण्याचा अधिकार उमेदवाराला नाही.

हा निकाल 'इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस' (आयएफएस) २०१३ च्या भरती प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात जी. किरण नावाच्या उमेदवाराने पूर्व परीक्षेत आरक्षित प्रवर्गासाठी लागू असलेल्या कमी कट-ऑफचा लाभ घेत पात्रता मिळवली होती. त्यानंतर मुख्य परीक्षा आणि मुलाखतीत त्यांनी अतिशय चांगली कामगिरी केली. परिणामी, अंतिम गुणवत्ता यादीत त्यांचा क्रमांक (रँक) १९ आला, जो अनेक खुल्या प्रवर्गातील उमेदवारांपेक्षा वरचा होता.

या आधारावर जी. किरण यांनी 'जनरल इनसायडर' म्हणजेच खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा केला. कर्नाटक उच्च न्यायालयाने सुरुवातीला हा दावा मान्य करत किरण यांच्या बाजूने निर्णय दिला होता. मात्र, केंद्र सरकारने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने सर्व बाबींचा सखोल विचार करून कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवला.

न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले की, जी. किरण यांनी पूर्व परीक्षेत आरक्षणाचा लाभ घेतल्यामुळे त्यांची संपूर्ण भरती प्रक्रिया आरक्षित प्रवर्गातील उमेदवार म्हणूनच ग्राह्य धरली जाईल. जरी अंतिम रँक १९ असला आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचा रँक ३७ असला, तरीही केवळ अंतिम टप्प्यातील गुणवत्तेच्या आधारावर खुल्या कोट्यात प्रवेश देणे कायदेशीर ठरणार नाही. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने 'सौरव यादव विरुद्ध भारत संघ' या आधीच्या महत्त्वपूर्ण प्रकरणाचा संदर्भ दिला. त्या निकालातही स्पष्ट करण्यात आले होते की, ओपन कॅटेगरी ही सर्वांसाठी खुली असली, तरी त्या प्रवर्गात प्रवेशासाठी संपूर्ण भरती प्रक्रिया सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामान्य (अनारक्षित) निकषांवर आधारित असणे आवश्यक आहे. म्हणजेच, कोणतीही सवलत न घेता मिळवलेली गुणवत्ता हीच खुल्या प्रवर्गासाठी ग्राह्य धरली जाईल.

न्यायालयाने ठामपणे अधोरेखित केले की, भरती प्रक्रिया ही एकात्मिक आणि सलग प्रक्रिया असते. प्रक्रियेच्या सुरुवातीलाच आरक्षणाचा लाभ घेतल्यास, ती ओळख संपूर्ण प्रक्रियेत कायम राहते. अंतिम टप्प्यात अधिक गुण मिळाले म्हणून आरक्षित प्रवर्गाची ओळख नाकारून खुल्या प्रवर्गात प्रवेश मागणे हे घटनात्मक तत्वांना आणि आरक्षणाच्या मूळ उद्देशालाही विरोधी ठरेल.

या निर्णयामुळे भविष्यातील सर्व केंद्रीय आणि राज्यस्तरीय भरती प्रक्रियांवर मोठा परिणाम होणार असून, उमेदवारांना अर्ज करतानाच कोणत्या प्रवर्गातून स्पर्धा करायची आहे, याबाबत अधिक जागरूक आणि स्पष्ट भूमिका घ्यावी लागणार आहे.

## भाजपाची प्रतिष्ठा पणाला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहराच्या राजकारणात भाजपचे बालेकिल्ले म्हणून ओळख असलेल्या कोथरूड विधानसभा मतदारसंघात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भाजपचे सत्ताकेंद्र अशी गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली ओळख कायम राखण्यासाठी या मतदारसंघातील सर्व प्रभागांमध्ये भाजपचेच उमेदवार निवडून यावेत, यासाठी पक्षाकडून काटेकोर नियोजन करण्यात येत आहे.

कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे महत्त्व यासाठी अधिक वाढले आहे की, या मतदारसंघातून भाजपचे अनेक प्रभावी नेते प्रतिनिधित्व करतात. केंद्रीय राज्यमंत्री, राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच एक खासदार हे सर्व भाजपचेच नेते कोथरूड मतदारसंघाशी संबंधित आहेत. त्यामुळे महापालिका निवडणुकीत कोथरूड मतदारसंघात येणाऱ्या पाच प्रभागांतील जागा जिंकणे हा भाजपसाठी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे.

२०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत कोथरूडमधील मयूर कॉलनी–डहाणूकर कॉलनी प्रभागातून मुरलीधर मोहोळ यांनी विजय मिळवला होता. त्यानंतर त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली आणि ते खासदार झाले. सध्या ते केंद्रीय राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याच पार्श्वभूमीवर, कोथरूड विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या पाचही प्रभागांत भाजपचे उमेदवार विजयी व्हावेत, यासाठी पक्षाने रणनीती आखली आहे. कोथरूड मतदारसंघातील ही निवडणूक भाजपसाठी पुण्यातील वर्चस्वाची लढाई असल्याचे म्हणूनच म्हटले जात आहे.

## संपादकीय

### वाढीचे अस्वस्थ पायाभूत प्रश्न

**भारतीय अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा वेगाने वाढत असल्याचे चित्र आकडेवारीतून दिसते. मात्र, या वाढीमागील गुणवत्ता, समावेशकता आणि टिकाऊपणा याबाबतचे प्रश्न कायम आहेत. वरवरच्या यशाआड दडलेल्या संरचनात्मक मर्यादा समजून घेणे आज अधिक गरजेचे ठरते.**

अपेक्षेपेक्षा वेगाने वाढणारी भारतीय अर्थव्यवस्था हे सध्या दिलासादायक चित्र असले, तरी त्या वाढीखाली दडलेले काही प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाहीत. अलीकडील आकडेवारी अर्थव्यवस्थेचा वेग समाधानकारक असल्याचे दाखवते; मात्र ही वाढ किती समावेशक, टिकाऊ आणि गुणवत्तापूर्ण आहे, हा खरा कळीचा मुद्दा ठरतो. ‘वाढ झाली म्हणजे सगळे प्रश्न सुटले,’ असा सोपा निष्कर्ष काढण्याचा धोका येथेच आहे. सर्वप्रथम वरवर दिसणाऱ्या चित्राकडे पाहिले, तर जीडीपी वाढीचे श्रेय पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्च, काही प्रमाणात उत्पादन क्षेत्रातील हालचाल आणि सेवाक्षेत्रातील चांगल्या कामगिरीला दिले जाते. निर्यातीत स्थैर्य आणि काही क्षेत्रांत वाढलेली गुंतवणूकही त्यात भर घालते. मात्र, ही वाढ एखाद्या तिमाहीपुरती मर्यादित न राहता सातत्याने टिकते का, याचा विचार करणे आवश्यक आहे. आकड्यांचा उत्सव साजरा करण्यापेक्षा त्यांच्या मागील प्रवाह समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. येथेच ‘वाढ आणि गुणवत्ता’ यातील फरक प्रकर्षाने समोर येतो. अर्थव्यवस्थेचा वेग वाढत असला, तरी देशांतर्गत मागणी, रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाटप याबाबत समाधानकारक चित्र दिसत नाही. वाढ काही मोजक्या क्षेत्रांपुरती किंवा भांडवली-प्रधान उद्योगांपुरती सीमित राहिली, तर तिचा लाभ समाजाच्या व्यापक घटकांपर्यंत पोहोचत नाही. परिणामी असमानता वाढते आणि विकासाचा पाया कमकुवत राहतो. अशा परिस्थितीत ‘आकड्यांची भरभराट’ आणि ‘लोकांच्या हातातील पैसा’ यांत अंतर राहू नये. उच्च वाढीच्या काळात वित्तीय जोखमीही वाढतात. महागाईचा दबाव, व्याजदरांतील चढ-उतार आणि वित्तीय संस्थांवरील ताण हे मुद्दे दुर्लक्षित करता येणार नाहीत. कर्जवाढीचा वेग, संभाव्य थकबाकी आणि जागतिक बाजारातील अस्थिरता यांचा थेट परिणाम देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर होतो. वाढ टिकवण्यासाठी वित्तीय शिस्त आणि सावध धोरणे आवश्यक ठरतात. कृषी आणि ग्रामीण मागणी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ग्रामीण भागातील उत्पन्न वाढल्याशिवाय एकूण मागणीला बळकटी मिळत नाही. काही काळ ग्रामीण खरेदीत सुधारणा दिसली, तरी ती प्रामुख्याने मान्सून, उत्पादनखर्च आणि किमतींवर अवलंबून असते. शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर नसेल आणि त्यात काही वाढही होत नसेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्था डगमगण्याचा धोका कायम राहतो. गुंतवणूक आणि संरचनात्मक सुधारणांबाबतही संमिश्र चित्र आहे. काही क्षेत्रांत भांडवली खर्च वाढताना दिसतो; मात्र अंमलबजावणीतील अडथळे, धोरणातील अनिश्चितता आणि बाजारातील मर्यादा यांमुळे अपेक्षित परिणाम सर्वत्र दिसत नाहीत. दीर्घकालीन विकासासाठी केवळ घोषणा नव्हे, तर त्यांची परिणामकारक अंमलबजावणीही तितकीच गरजेची आहे. रोजगारनिर्मिती हा कदाचित सर्वांत संवेदनशील मुद्दा आहे. वेगवान वाढ असूनही, रोजगार संधी अपेक्षेइतक्या वाढत नसतील, तर त्या वाढीची सामाजिक उपयुक्तता प्रश्नांकित ठरते. उत्पादन, बांधकाम आणि आधुनिक सेवाक्षेत्रात शाश्वत रोजगार तयार झाले, तरच उत्पन्नवाटप सुधारेल. अन्यथा क्षेत्रीय आणि भौगोलिक असमानता ही कायमच राहील. त्यायाशिवाय, जागतिक घडामोडींचा प्रभावही दुर्लक्षित करता येणारा नाही. ऊर्जा किमती, आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील बदल, तसेच अमेरिका आणि युरोपमधील चलनविषयक धोरणे यांचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत धोरणांची दिशा अधिक संतुलित आणि दूरदर्शी असणे गरजेचे आहे. भारतीय अर्थव्यवस्था वाढते आहे, ही नक्कीच सकारात्मक बाब. मात्र, ही वाढ किती टिकाऊ, सर्वसमावेशक आणि स्थिर आहे, हे तपासणेही तितकेच महत्त्वाचे. उच्च गुणवत्तेची वाढ, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत आधार, रोजगारनिर्मितीवर भर आणि वित्तीय स्थैर्य अशा चौकटीतच खरा विकास साध्य होऊ शकतो. अन्यथा वाढीच्या आकड्यांआड दडलेले प्रश्न भविष्यात अधिक तीव्र रूप धारण करू शकतात, याची जाणीव आज ठेवणे आवश्यक आहे.

# आयोगाची कसोटी आणि लोकशाहीचा विश्वास

**निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य हे भारतीय लोकशाहीचे मूलभूत बळ मानले जाते. मात्र, अलीकडील वादग्रस्त पत्रव्यवहार आणि नागरिकत्वाशी निगडित निर्णयांमुळे आयोगाची भूमिका, त्याची स्वायत्तता आणि जनविश्वास ऐरणीवर आले आहेत.**




भारतीय लोकशाहीत निवडणूक आयोग ही निव्वळ एक घटनात्मक संस्था आहे असे नाही, तर निवडणूक प्रक्रियेवरील जनविश्वासाची ती हमी मानली जाते. निवडणुका मुक्त, निष्पक्ष आणि कोणत्याही दबावाशिवाय व्हाव्यात यासाठी आयोगाचे स्वातंत्र्य अबाधित राहणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. मात्र, अलीकडील काळात आयोगाच्या काही भूमिकांवर, विशेषतः नागरिकत्व, मतदार याद्या आणि विदेशी मुख्यत्वे घुसखोरांना वगळण्याच्या संदर्भातील निर्णयांवर प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेले तथाकथित इच्छेविरुद्ध पत्र हे प्रशासकीय नाराजीचे द्योतक नसून, ते संस्थात्मक स्वायत्ततेवरील व्यापक चिंतेकडे निर्देश करणारे ठरते. घटनात्मक चौकट ही स्पष्ट आहे. निवडणूक आयोगाचे प्रमुख कर्तव्य म्हणजे निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवणे, मतदारांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि कोणत्याही राजकीय हस्तक्षेपापासून दूर राहणे. मतदार याद्यांची शुद्धता, नावनोंदणीतील समावेशन आणि वगळणे, तसेच आचारसंहितेची अंमलबजावणी या सर्व बाबी आयोगाच्या निष्पक्षतेवर अवलंबून असतात. मात्र, जेव्हा काही निर्णय राजकीय अजेंड्याच्या छायेत घेतले जात असल्याचा संशय निर्माण होतो, तेव्हा आयोगावरील जनविश्वास डळमळीत होण्याचा धोका वाढतो. विदेशी नागरिकांना मतदार यादीतून वगळण्याचा मुद्दा हा त्यातीलच एक संवेदनशील भाग. कोणताही सार्वभौम देश आपल्या नागरिकत्वाविषयी सजग असणे स्वाभाविक आहे. मात्र हे करताना प्रक्रिया किती पारदर्शक, न्याय्य आणि कायदेशीर चौकटीत आहे, हा खरा प्रश्न आहे. नागरिकत्व सिद्ध करण्याची जबाबदारी, पुराव्यांचे निकष, अपीलची संधी आणि अंतिम निर्णयाची वेळ यांचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. आयोगाने या प्रक्रियेत अती-सावधपणा किंवा अती-धाडस दाखवले, तर त्याचे दूरगामी सामाजिक आणि राजकीय परिणाम संभवतात. याच ठिकाणी धाडस विरुद्ध सावधपणा असे द्वंद्व सुरू होते. संस्थात्मक स्वायत्तता टिकवण्यासाठी आयोगाने सत्तेच्या दबावांना ठामपणे विरोध करणे आवश्यक असते. त्याच वेळी कायदेशीर मर्यादा, न्यायालयीन पुनरावलोकन आणि सामाजिक सलोखा यांचाही विचार करावा लागतो. या संतुलनाचा अभाव असेल, तर निर्णय योग्य असला तरी त्याची विश्वासार्हता कमी होते. लोकशाहीत केवळ निर्णय नव्हे, तर निर्णयप्रक्रिया देखील तितकीच महत्त्वाची असते. सध्याच्या राजकीय वातावरणात स्वतंत्र संस्था हा शब्द अनेकदा कागदोपत्री मर्यादित राहिलेला दिसून येतो. सत्ताधारी घटक संस्थांच्या कामकाजात हस्तक्षेप करू लागले, तर त्याचा सर्वाधिक फटका अशाच घटनात्मक संस्थांना बसतो. निवडणूक आयोगाचे निर्णय जातीय, धार्मिक किंवा राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकू शकतात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. म्हणूनच आयोगाने केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक उंचीही जपणे अपेक्षित असते. कायदेशीर दृष्टीने पाहता, नागरिकत्व आणि मतदार हक्क हे परस्परांशी निगडित पण स्वतंत्र विषय आहेत. वाढत्या जागतिक स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर, नागरिकत्वाबाबतचे निर्णय अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. अशा वेळी निवडणूक आयोगाने इतर प्रशासकीय यंत्रणांवर अवलंबून न राहता स्वतःची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे गरजेचे ठरते. डिजिटल नोंदी, दस्तऐवजांची पडताळणी, आणि अपील यंत्रणेची सुलभता हे सगळे लोकशाही विश्वास टिकवण्यासाठी अपरिहार्य घटक आहेत. या साऱ्या प्रक्रियेचा सामाजिक परिणामही तितकाच महत्त्वाचा आहे. अशा पत्रांमुळे आणि वादांमुळे समाजात ध्रुवीकरण वाढू शकते. काही घटकांना आपले हक्क धोक्यात असल्याची भावना निर्माण होते, तर काहींना राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे अग्रक्रमावर वाटतात. या दोन्ही टोकांमध्ये समतोल साधण्याची जबाबदारी केवळ राजकीय नेतृत्वाची नाही, तर निवडणूक आयोगासारख्या संस्थांचीही आहे. माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि नागरी समाज यांनीही या चर्चेला विवेकपूर्ण दिशा देणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाचे खरे सामर्थ्य त्याच्या अधिकारांत नाही, तर त्याच्या विश्वासार्हतेत आहे. स्वायत्तता, पारदर्शकता आणि न्याय्य प्रक्रिया या त्रिसूत्रीवरच लोकशाही भक्कमपणे उभी आहे. विदेशी (घुसखोर) नागरिकांना वगळण्यासारखे निर्णय अपरिहार्य असतील, तर ते स्पष्ट नियमांवर, न्यायालयीन देखरेखीखाली आणि मानवी हक्कांचा आदर राखून घेतले गेले पाहिजेत. अन्यथा इच्छेविरुद्ध पत्र हा भारतीय लोकशाहीतील अस्वस्थतेचे प्रतीक ठरू शकतो.

## एसटीचे १६०० कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याच्या मार्गावर

### परिवहन मंत्री सरनाईकांचा अधिकाऱ्यांना थेट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासाठी (एसटी) मंजूर असलेला तब्बल १६०० कोटी रुपयांचा निधी खर्च न होता परत जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक चांगलेच भडकले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ संपण्यास अवघे काही महिने शिल्लक असताना कामकाजातील दिरंगाई आणि निविदा प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे निधी वापरात येत नसल्याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांची कडाडून कानउघाडणी केली. ठरलेल्या मुदतीत कामे मार्गी न लागल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

**+ आठ हजार नव्या बस खरेदीची प्रक्रिया रखडल्याने संताप; आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी निधी खर्च न झाल्यास कठोर कारवाईचा इशारा**

राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार एसटी महामंडळाला २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकूण २ हजार ४६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचा वापर बसस्थानकांची उभारणी, दुरुस्ती व विस्तारीकरण, प्रवाशांसाठी स्वच्छतागृहे, सुरक्षाव्यवस्था तसेच पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत एसटी स्थानकांवर व आगारांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, जुन्या इमारतींची दुरुस्ती आणि प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक कामे प्रस्तावित आहेत.

तसेच महामंडळाच्या ताफ्यातील आयुर्मान संपलेल्या व मोडकळीस आलेल्या बस सेवेतून काढून टाकून नव्या, पर्यावरणपूरक बस दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदा एकूण आठ हजार नव्या बस एसटी ताफ्यात समाविष्ट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी आतापर्यंत तीन हजार बससाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून दोन खासगी कंपन्यांना कामाचे आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित पाच हजार बससाठी निविदा प्रक्रिया सुरू असली तरी ती अपेक्षित गतीने पूर्ण होत नसल्याचे चित्र आहे.

आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे तीन महिने शिल्लक असताना १६०० कोटी रुपयांचा निधी अद्याप खर्च न झाल्याने मंत्री सरनाईक यांनी आढावा बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, आर्थिक सल्लागार गिरीश देशमुख तसेच विविध खातेप्रमुख उपस्थित होते. व्यवस्थापन, पायाभूत सुविधा आणि बस खरेदीसंबंधीच्या निविदा रखडल्याने निधी वापरात येत नसल्याचे निदर्शनास आले. यावेळी सरनाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, तातडीने सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रलंबित कामांना गती द्यावी. निधी खर्चात कोणतीही चालढकल किंवा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही.

## पुणे रेल्वेचा सुरक्षेवर भर; ८ स्थानकांवर ११ स्कॅनर बसवणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ पुणे स्थानकावर चार स्कॅनर, धोकादायक वस्तू आढळल्यास तात्काळ कारवाई**

**पुणे :** पुणे रेल्वे विभागाने प्रवासी आणि मालवाहतुकीबरोबरच पार्सल सुरक्षेसाठी मोठे पाऊल उचलले असून, आता पुणे रेल्वे विभागातून पाठविण्यात येणारे प्रत्येक पार्सल स्कॅन करूनच पुढे पाठवले जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पुणे रेल्वे विभागातील आठ महत्त्वाच्या स्थानकांवर एकूण ११ पार्सल स्कॅनर मशिन बसवण्यास रेल्वे बोर्डाने मान्यता दिली आहे. यामुळे पार्सलमधून धोकादायक किंवा संशयास्पद वस्तू पाठवण्याच्या घटनांना आळा घालता येणार आहे.

मध्य रेल्वेमधील पुणे हा अत्यंत महत्त्वाचा विभाग असून, या विभागात एकूण ८३ रेल्वे स्थानके आहेत. दररोज पुणे विभागातून २०० पेक्षा अधिक रेल्वे गाड्या धावतात आणि सुमारे पावणे दोन लाख प्रवासी प्रवास करतात. प्रवासी व मालवाहतुकीनंतर पार्सल सेवा हा उत्पन्नाचा मोठा स्रोत असून, गेल्या वर्षी पुणे रेल्वे विभागाला पार्सलमधून सुमारे २१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. पार्सलमधील उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असल्याने सुरक्षेचा प्रश्नही अधिक महत्त्वाचा ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर पुणे रेल्वे विभागाने विविध स्थानकांसाठी पार्सल स्कॅनरचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठवला होता. त्याला मंजुरी मिळाली असून, सर्वाधिक पार्सल पाठविले जाणाऱ्या पुणे रेल्वे स्थानकावर चार स्कॅनर बसवले जाणार आहेत.

याशिवाय कोल्हापूर, दौंड, मिरज, हडपसर, खडकी, अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी येथे प्रत्येकी एक पार्सल स्कॅनर बसवण्यात येणार आहे. स्कॅनिंगदरम्यान धोकादायक वस्तू आढळल्यास संबंधित पार्सल रोखून तात्काळ कारवाई केली जाणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## “खरी फाईट राष्ट्रवादीसोबतच” – भाजपने नाकारलेल्यांना अजितदादांकडून तिकीट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ गणेश बिडकरांचा घणाघात**

**पुणे :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात महायुतीतील घटक पक्षांमध्येच तणाव वाढताना दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पार्टी यांच्यातील वाद आता उघडपणे समोर येऊ लागला असून, भाजप नेते गणेश बिडकर यांनी राष्ट्रवादीवर थेट हल्लाबोल केला आहे. “पुण्यात खरी लढत ही राष्ट्रवादीसोबतच आहे,” असे स्पष्ट मत बिडकर यांनी व्यक्त केले.


महापालिका निवडणुकीआधीच दोन्ही पक्ष आमनेसामने उभे ठाकल्याचे चित्र आहे. भाजपने उमेदवारी नाकारलेल्या अनेकांना राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून थेट तिकीट देण्यात आले आहे, असा गंभीर आरोप बिडकर यांनी केला. “भाजपने नाकारलेले उमेदवार राष्ट्रवादीकडून स्वीकारले जात असतील, तर जनतेसमोर याचा हिशेब द्यावा लागेल,” असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

गणेश बिडकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीवर निशाणा साधताना, कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरही जोरदार टीका केली. “राष्ट्रवादीला आता कोयता गँगवर बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही,” असा टोला त्यांनी लगावला. गुन्हेगारी प्रवृत्तींबाबत राष्ट्रवादी दुहेरी भूमिका घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, महापालिका निवडणुकीत पुणेकर जनता भाजपच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास बिडकर यांनी व्यक्त केला. विकास, सुरक्षा आणि पारदर्शक कारभार या मुद्द्यांवर भाजप निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महायुतीतील हे अंतर्गत आरोप-प्रत्यारोप वाढत चालल्याने, येत्या काळात पुण्याच्या राजकारणात वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पुणेकरांनो सावधान! बोपदेव घाट पुढील ७ दिवस पूर्णपणे बंद

### रस्ते रुंदीकरण व दुरुस्ती कामामुळे वाहतूक ठप्प; प्रशासनाकडून दिवे घाट व चिव्हेवाडी घाटाचे पर्यायी मार्ग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे शहर आणि पुरंदर तालुक्याला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा बोपदेव घाट मार्ग आजपासून पुढील सात दिवसांसाठी सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घाटातील रस्त्याचे रुंदीकरण आणि दुरुस्तीचे महत्त्वपूर्ण काम हाती घेण्यात आले असून, सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. बुधवार, १४ जानेवारीपर्यंत हा घाट बंद राहणार असल्याने या मार्गावर अवलंबून असलेल्या हजारो वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे.

बोपदेव घाट हा केवळ सासवड, कोंढवा परिसरापुरताच मर्यादित नसून, पुरंदर तालुक्यासह आजूबाजूच्या अनेक गावांसाठी तो वाहतुकीचा प्रमुख आणि सोयीस्कर मार्ग आहे. मात्र, गेल्या काही काळापासून रस्त्याची अरुंद अवस्था, खड्डे आणि खराब पायाभूत सुविधांमुळे या घाटात वारंवार वाहतूक कोंडी आणि अपघात होत होते. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण आणि आवश्यक डागडुजीचे काम सुरू केले आहे.

**पर्यायी मार्ग कोणते?**

- प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी प्रशासनाने दोन प्रमुख पर्यायी मार्ग सुचवले आहेत. पुणे किंवा सासवडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांनी हडपसरमार्गे ‘दिवे घाट’ वापरावा. तसेच दक्षिणेकडील भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी नारायणपूरमार्गे ‘चिव्हेवाडी घाट’ हा पर्याय निवडावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जरी या पर्यायी मार्गांमुळे प्रवासाचे अंतर आणि वेळ काही प्रमाणात वाढणार असला, तरी घाटातील काम वेळेत आणि सुरक्षितपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, १४ जानेवारीनंतर काम पूर्ण झाल्यावर बोपदेव घाट मार्ग पुन्हा सर्वसामान्य वाहतुकीसाठी खुला केला जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तोपर्यंत वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, प्रवासाचे नियोजन आधीच करूनच घराबाहेर पडावे आणि पोलीस व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## लायसन्स आणि आरसी बुक घरपोच सेवेला महागाईचा फटका

### शुल्कात थेट वाढ; १ जानेवारीपासून नवीन दर लागू; परवाना व आरसी घरपोच मिळवण्यासाठी आता ७० रुपये मोजावे लागणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** वाहनचालकांसाठी महत्त्वाची बातमी असून परिवहन विभागाकडून दिल्या जाणाऱ्या परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) घरपोच सेवेच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे. यापुढे लायसन्स किंवा आरसी बुक घरपोच मिळवण्यासाठी नागरिकांना ५८ रुपयांऐवजी ७० रुपये मोजावे लागणार आहेत. हा वाढीव दर १ जानेवारीपासून लागू करण्यात आला असून, त्यामुळे सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

राज्याच्या परिवहन विभागामार्फत वाहन चालकाने चाचणी उत्तीर्ण केल्यानंतर तसेच नवीन वाहन नोंदणी झाल्यानंतर परवाना व आरसी बुक टपाल विभागामार्फत संबंधित व्यक्तीच्या पत्त्यावर पाठविण्यात येते. या सेवेसाठी परिवहन विभाग आणि टपाल विभागामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार दरवर्षी नूतनीकरण केला जातो. टपाल विभागाकडून या सेवेसाठी १८ टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) आकारला जात असल्याने आतापर्यंत नागरिकांकडून प्रत्येकी ५८ रुपये शुल्क आकारले जात होते.

मात्र, टपाल विभागाने अलीकडेच परिवहन विभागाकडे स्थानिक (जिल्ह्यांतर्गत) आणि गैरस्थानिक (जिल्ह्याबाहेरील) पत्त्यांसाठी वेगवेगळे दर आकारण्याचा प्रस्ताव पाठवला होता. त्यानुसार जिल्ह्यांतर्गत घरपोच सेवेसाठी ४४.६५ रुपये, तर जिल्ह्याबाहेरील पत्त्यासाठी ८०.९९ रुपये सेवाशुल्क आकारण्याची सूचना करण्यात आली होती. या प्रस्तावाला परिवहन विभागाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. थापि, ‘वाहन’ आणि ‘सारथी’ या ऑनलाईन प्रणालीमध्ये दोन वेगवेगळे दर तांत्रिकदृष्ट्या आकारणे शक्य नसल्यामुळे, सर्वांसाठी एकसमान दर लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार परवाना किंवा वाहन नोंदणी प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी प्रत्येकी ७० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. यासंदर्भात परिवहन विभागाने अधिकृत परिपत्रकही जारी केले असून, १ जानेवारीपासून नव्या दराने आकारणी सुरू करण्यात आली आहे. दरवाढीचा थेट परिणाम एकूण परवाना शुल्कावरही झाला आहे. वाढीव घरपोच सेवा शुल्कामुळे पक्क्या परवान्यासाठी आता ७७० रुपये (पूर्वी ७५८ रुपये), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७० रुपये (पूर्वी ४५८ रुपये) आणि दुचाकी-चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार आहेत. परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की, १ ऑक्टोबर २०२५ नंतर ज्यांनी वाहन खरेदी केली आहे, पक्के परवाने किंवा परवाना नुतनीकरण केले आहे, त्यांच्याकडून १ जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसारच आकारणी करण्यात यावी.

> परिवहन विभागाच्या निर्देशानुसार नागरिकांना घरपोच देण्यात येणाऱ्या सेवांच्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे.
>
> — **स्वप्निल भोसले,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

**असे शुल्क मोजावे लागणार**

- परिवहन विभागाच्या घरपोच सेवेसाठी दरवाढ केल्यामुळे पक्क्या परवान्यासाठी ७७० रुपये (जुने दरानुसार ७५८), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७०(जुन्या दरानुसार ४५८) रुपये आणि दुचाकी चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार असून एक ऑक्टोबर २०२५ पासून ज्या नागरिकांनी वाहने घेतली आहेत, पक्के परवाने किंवा नुतनीकरण केले आहे, त्यानुसार एक जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसार आकारणी करावी असे निर्देश दिले आहेत.

**सेवेचा आढावा**

- – पूर्वीचे टपाल शुल्क – ५८ रुपये जीएसटीसह
- – नवीन टपाल शुल्क – ७० रुपये जीएसटीसह
- – एकूण वाढ – प्रती सेवा १२ रुपयांची

## हिंजेवाडीत TCS कार्यालयात २४ वर्षीय आयटी इंजिनिअरची आत्महत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** हिंजेवाडी आयटी पार्कमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) कंपनीच्या कार्यालयात एका २४ वर्षीय आयटी इंजिनिअरने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजल विनोद ओस्वाल (वय २४, रा. वानवडी) असे मृत तरुणाचे नाव असून, तो TCS मध्ये कार्यरत होता.

ही घटना हिंजेवाडी फेज-३ येथील TCS कार्यालयाच्या प्रसाधनगृहात रात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. नियमित गस्तीवर असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना संशयास्पद बाब आढळल्यानंतर वरिष्ठांना माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितले की, प्राथमिक चौकशीत सुजल ओस्वाल हा ऑनलाईन बेटिंगच्या आहारी गेला होता आणि त्यात त्याला आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. याच तणावातून त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज आहे. आत्महत्येपूर्वी त्याने कुटुंबियांना संदेश पाठवला असल्याची माहितीही समोर आली आहे. घटनेनंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून, हिंजेवाडी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपासाचा भाग म्हणून कंपनीतील अधिकारी, सहकारी तसेच नातेवाईकांचे जबाब नोंदवले जात आहेत. घटनेचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणावर TCS कंपनीची भूमिका जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्यात आला असता, अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### कॅट वे चषकावर शिवनेर स्पोर्ट्स क्लब बोडकेनगरची मोहोर

**जुन्नर :** कॅट वे स्पोर्ट्स क्लबतर्फे दिवंगत खेळाडूंच्या स्मरणार्थ आयोजित कॅट वे चषक स्पर्धेत शिवनेर स्पोर्ट्स क्लब बोडकेनगरने मानाची ट्रॉफी पटकावली. पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातील १६ संघांच्या सहभागाने पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेला क्रीडाप्रेमी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाअंतिम सामन्यात शिवनेर बोडकेनगरने शिव छत्रपती वॉरियर्स जुन्नरचा पराभव करत ६५ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक जिंकले. प्रमोद बोडके मालिकावीर ठरला.

### जुन्नरमध्ये कायदेविषयक शिबिर संपन्न

**जुन्नर :** शंकरराव बुट्टे पाटील कनिष्ठ महाविद्यालयात तालुका विधी सेवा समिती, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे व जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा व अति-सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबिर संपन्न झाले. यावेळी विद्यार्थ्यांना पोस्को कायदा, बालविवाह प्रतिबंध, महिलांची सुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांचे हक्क व ड्रग्समुक्त भारत या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

### ढगाळ हवामानाचा गहू पिकाला फटका; शेतकरी चिंतेत


**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात गेल्या चार-पाच दिवसांपासून ढगाळ हवामान व वाढलेली आर्द्रता यामुळे गहू पिकावर प्रतिकूल परिणाम दिसून येत आहे. पूर्व भागातील पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर आदी गावांमध्ये गहू पिकावर तांबेरा रोगाची लक्षणे आढळत असून पानांवर पिवळसर ठिपके दिसत आहेत. काही ठिकाणी काळ्या माव्यांचा प्रादुर्भाव होण्याची भीती असून उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे गहू उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत.

---

### शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला सुवर्णसंधी; शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला सुवर्णसंधी

# आंबेगावच्या पश्चिम पट्ट्यात 'गोल्डन बेरी'चा नवा प्रयोग!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांपलीकडे जात नवनवीन प्रयोग करण्यास सुरुवात केली असून, स्ट्रॉबेरीच्या यशस्वी लागवडीनंतर आता 'गोल्डन बेरी' या बेरी वर्गातील पोषक पिकाची प्रयोगिक लागवड करण्यात आली आहे. सुमारे १३० शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरीची लागवड यशस्वी केल्यानंतर काही प्रगतशील शेतकऱ्यांनी यावर्षीपासून गोल्डन बेरीसारख्या आरोग्यदायी पिकांकडे वळण्याचा निर्णय घेतला आहे.

गोल्डन बेरीला मराठीत पोप्ती, चिरबोट, फोपाटी किंवा रसभरी असेही म्हणतात. हे लहान, नारंगी रंगाचे, गोड-आंबट चवीचे फळ असून पातळ कागदी कवचात संरक्षित असते. व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असलेल्या या फळाला सध्या आरोग्याच्या दृष्टीने मोठी मागणी आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, हृदयाचे आरोग्य सुधारणे, मधुमेह नियंत्रणात ठेवणे, पचनक्रिया सुधारणा, डोळे व त्वचेसाठी फायदेशीर ठरणे तसेच कर्करोगविरोधी गुणधर्म यामुळे गोल्डन बेरीला 'सुपरफूड' म्हणून ओळखले जात आहे.

शिंदेवाडी येथील शेतकरी नारायण कुदळे, कानसे येथील शेतकरी संतोष धादवड आणि फुलवडे येथील शेतकरी गौरव बबन गभाले यांनी सुमारे ५० गुंठे क्षेत्रावर गोल्डन बेरीची प्रयोगिक लागवड केली आहे. महाबळेश्वर येथून फळे आणून ती सुकवून त्यापासून रोपे तयार करण्यात आली. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शेतात मातीचे बेड तयार करून मल्चिंग पेपर अंथरून दीड ते एक फुटाच्या अंतरावर रोपांची लागवड करण्यात आली. लागवडीनंतर अवघ्या दोन महिन्यांत फळधारणा सुरू झाली असून उत्पादन अनेक महिने चालते, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

गोल्डन बेरीचा उगम दक्षिण अमेरिकेतील अँडीज पर्वतरांगांमध्ये मानला जातो. काही ग्राहकांना या फळाची चव पाइनॅपल किंवा स्ट्रॉबेरीसारखी वाटते. या फळांचा वापर ताजी फळे, सुकवलेली स्नॅक्स, स्मूदीज, सॅलड्स, जॅम तसेच मिठाईमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. मात्र कच्ची फळे खाणे टाळावे, ऽफक्त पूर्णपणे पिकलेली नारंगी फळेच खावीत, असा सल्ला कृषी तज्ज्ञ देत आहेत.

आंबेगाव तालुका कृषी सहाय्यक अरविंद मोहरे यांनी सांगितले की, गोल्डन बेरी आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असली तरी गर्भवती महिला, मधुमेहाचे रुग्ण किंवा रक्त पातळ करणारी औषधे घेणाऱ्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेऊनच ही फळे खावीत. फायबरचे प्रमाण जास्त असल्याने अतिसेवन केल्यास पोटाच्या तक्रारी उद्भवू शकतात, त्यामुळे कमी प्रमाणात सेवन करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

फुलवडे येथील शेतकरी गौरव गभाले यांनी सांगितले की, "प्रयोग म्हणून केलेल्या लागवडीतून अपेक्षेपेक्षा चांगले उत्पादन मिळत आहे. झाडांची वाढ चांगली असून बाजारातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे." कानसे येथील शेतकरी संतोष धादवड यांनी 'नेचर बेस्ट' या स्वतःच्या ब्रँडअंतर्गत गोल्डन बेरी व मलबेरी या दोन जातींची विक्री सुरू केली असून, भिमाशंकर तसेच शहरी व ग्रामीण भागात या फळांना चांगली मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. या नव्या पिकामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला नवी दिशा मिळत असून आंबेगाव तालुक्यातील शेती अधिक नावीन्यपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.न

---

## बस्ती सावरगावला शरदचंद्र पवार इंजिनिअरिंग कॉलेजचा स्तुत्य उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून ग्रामस्वच्छता, आरोग्य व पर्यावरणाचा संदेश

**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ओतूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने बस्ती सावरगाव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर उत्साहात पार पडले. सोमवार दि. २९ डिसेंबर ते रविवार दि. ४ जानेवारी या कालावधीत आयोजित या शिबिरातून ग्रामस्वच्छता, आरोग्य जागृती आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य सोपान जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी मंडळाचे मानद सचिव वैभव तांबे, सरपंच प्रकाश गीदे, उपसरपंच बबन केवळ, प्राचार्य डॉ. जी. यू. खरात, कार्यक्रम अधिकारी स्वप्निल डुंबरे, प्राध्यापक, स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आठवडाभर चाललेल्या शिबिरात 'शाश्वत विकासासाठी युवक – पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन' ही संकल्पना राबविण्यात आली. स्वयंसेवकांनी गावातील रस्ते, स्मशानभूमी, मंदिरे, शिवकालीन वाडे परिसराची स्वच्छता करून ग्रामस्वच्छतेचा आदर्श घालून दिला. ३१ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, तर १ जानेवारीला वडज येथील ऑक्सिजन पार्कला भेट देत वृक्षसंवर्धनाची कार्यवाही करण्यात आली. ३ जानेवारी रोजी डॉ. अनंतराव कणसे हॉस्पिटलच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये रक्तदाब, हृदयरोग तपासणी करण्यात आली. विविध मान्यवरांनी आरोग्य, रक्तदान, पर्यावरण आणि सामाजिक जाणिवांवर मार्गदर्शन केले. निरोप समारंभात स्वयंसेवकांनी अनुभव कथन करत ग्रामस्थांची मने जिंकली. या शिबिरामुळे शिक्षणासोबतच समाजसेवेचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजल्याचे चित्र पाहायला मिळाले.

---

## अवसरी–निरगुडसर–पारगाव रस्त्यावरील काम संथ; धुळीमुळे नागरिक हैराण



■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर; आंदोलनाचा महिलांचा इशारा

**आंबेगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातून शिरूर तालुक्याकडे ये-जा करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला अवसरी फाटा–निरगुडसर–पारगाव मुख्य रस्ता सध्या नागरिकांसाठी मोठ्या त्रासाचे कारण ठरत आहे. या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून, काही ठिकाणी तर पंधरा दिवसांपासून काम पूर्णपणे बंद आहे. परिणामी या मार्गावरून धावणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून, रस्त्याच्या कडेला राहणाऱ्या नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः धुळीने व्यापले गेले आहे. हा रस्ता अवसरी फाटा ते अवसरी बुद्रूक, निरगुडसर, पारगाव, पिंपरखेड, जांबुत, शिक्रापूर या गावांना जोडणारा मुख्य दुवा आहे. सध्या अवसरी बुद्रूक येथील मुक्ताई मंदिराजवळ रस्त्याचे काम सुरू आहे. तसेच निरगुडसर फाटा ते निरगुडसर येथील बिरोबा मंदिर परिसरातही काम हाती घेण्यात आले होते. मात्र, गेल्या पंधरा दिवसांपासून या भागातील काम थांबले असून, त्यामुळे वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे धुळीचे लोळ उठत आहेत. या धुळीचा सर्वाधिक फटका रस्त्यालगत राहणाऱ्या नागरिकांना बसत आहे. घरासमोरील वाहने, भिंती, अंगण यावर धुळीचे जाड थर साचत आहेत. एवढेच नव्हे, तर घरातील भांडी, कपडे आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंवरही धूळ बसत असल्याने महिलांचे काम दुपटीने वाढले आहे.

"घर स्वच्छ केले तरी काही वेळात पुन्हा धूळ साचते," अशी व्यथा येथील महिला ग्रामस्थांनी मांडली. धूळ उडू नये म्हणून संबंधित ठेकेदाराने पाण्याच्या टँकरद्वारे रस्त्यावर पाणी मारण्याची व्यवस्था केली आहे. मात्र, टँकर चालक वेळेत पाणी मारत नसल्याचा आणि काही ठिकाणी पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक महिलांनी केला आहे.

---

## वयोवृद्ध महिलेची जमीन हडप केल्याचा धक्कादायक प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ शासकीय पैसे मिळणार असल्याचे आमिष; २९ आर जमीन कवडीमोल भावात हस्तांतरित

+ सहा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा

**भिगवण : इंदापूर तालुक्यातील म्हसोबाचीवाडी येथील ८० वर्षीय वयोवृद्ध महिलेची जमीन व्यवहारात फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी भिगवण पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गोदाबाई नानासाहेब चांदगुडे (वय ८०, रा. म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.**

तक्रारीनुसार, आरोपींनी फिर्यादीच्या वयोवृद्धपणाचा व अडाणीपणाचा गैरफायदा घेत "शासकीय पैसे मिळणार आहेत" असे आमिष दाखवले. त्यानंतर त्यांना बारामती येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नेण्यात आले. तेथे मौजे म्हसोबाचीवाडी येथील गट क्रमांक ५१७ मधील २९ आर जमीन आरोपी रमेश बबन चांदगुडे यांच्या नावावर नोंद करून घेतल्याचा आरोप आहे.

या जमिनीच्या बदल्यात बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी अशी केवळ २ लाख ४० हजार रुपयांची रक्कम फिर्यादीच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली. मात्र, ही रक्कम नंतर फिर्यादीचा नातू प्रितम पांडुरंग मंडलीक याने गोड बोलून बँकेत नेऊन काढून घेतल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

हा प्रकार ७ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत म्हसोबाचीवाडी, शेटफळगढे, घोलपवाडी तसेच बारामती येथील दुय्यम निबंधक कार्यालय परिसरात घडल्याचे एफआयआरमध्ये नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात कुलदीप रकटे, ओम लोढे, मयूर रसाळ आणि सागर भिसे यांचाही आरोपी म्हणून समावेश असून, भिगवण पोलीस पुढील तपास करत आहेत.

---

## आदरवाडी येथे पुणे–रायगड ग्रामीण पोलिस हद्द दर्शविणाऱ्या नामफलकाचे अनावरण

### डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पौड :** डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने मुळशी तालुक्यातील आदरवाडी (ता. मुळशी) येथे पुणे ग्रामीण व रायगड जिल्हा ग्रामीण पोलिसांच्या प्रशासकीय हद्दी दर्शविणाऱ्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. ताम्हिणी घाटातून पौडकडे येणाऱ्या पुणे–कोलाड महामार्गावरील या महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नामफलकाचे उद्घाटन पौड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या हस्ते पार पडले.

ताम्हिणी घाट परिसरात गेल्या काही काळापासून अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. मात्र या मार्गावर पोलिसांची प्रशासकीय हद्द व आपत्कालीन संपर्क क्रमांक दर्शविणारा कोणताही स्पष्ट नामफलक नसल्यामुळे नागरिक, प्रवासी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेला हा नामफलक आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांशी त्वरित संपर्क साधण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी व्यक्त केले. रायगड व पुणे ग्रामीण या दोन्ही जिल्ह्यांच्या पोलिसांच्या प्रशासकीय हद्दी स्पष्टपणे दर्शविणारा हा नामफलक पद्मश्री व महाराष्ट्र भूषण डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच डॉ. श्री सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने उभारण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हा उपक्रम राबवण्यात आल्याचे प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्रीसदस्य, पौड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रतिष्ठानच्या वतीने संपूर्ण पुणे शहर व जिल्ह्यात, शहरात येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर पोलिस ठाण्यांच्या हद्दी व आपत्कालीन संपर्क क्रमांक दर्शविणारे असे नामफलक टप्प्याटप्प्याने लावण्यात येणार आहेत.

---

## अवसरी खुर्द येथे आग्या मोहळाच्या हल्ल्यात पती-पत्नीला जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथे खंडोबा मंदिर बैलगाडा शर्यतीच्या घाटाजवळ आग्या मोहळाच्या मधमाशांनी पायी जाणाऱ्या पती-पत्नीवर अचानक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात दोघेही जखमी झाले असून त्यांच्यावर अवसरी येथील खाजगी रुग्णालयात तातडीने वैद्यकीय उपचार करण्यात आले. उपचारानंतर सध्या दोघांचीही प्रकृती स्थिर असून कोणताही गंभीर धोका नसल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

या घटनेत जखमी झालेले पती-पत्नी म्हणजे अवसरी खुर्द येथील सलून व्यावसायिक राजेंद्र क्षीरसागर आणि त्यांच्या पत्नी सुवर्णा क्षीरसागर होत. गेल्या तीन वर्षांपासून ते दररोज सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गावापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या खंडोबा मंदिर परिसरात, वारसुळा वस्ती मार्गे पायी फिरण्यासाठी जात असतात. हा मार्ग निसर्गरम्य असला तरी रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर घनदाट झाडी आहे.

चार दिवसांपूर्वी राजेंद्र क्षीरसागर आणि सुवर्णा क्षीरसागर हे नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी जात असताना, खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडीतून अचानक आग्या मोहळाच्या मधमाशांनी त्यांच्यावर हल्ला केला. कोणतीही पूर्वसूचना न देता मधमाशांनी दोघांच्या तोंडावर, हातांवर व पायांवर मोठ्या प्रमाणात चावे घेतल्याने काही क्षणांतच दोघांच्या शरीरावर तीव्र सूज आली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे दोघांचीही घबराट उडाली. हल्ल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमी पती-पत्नीला तातडीने अवसरी खुर्द येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तत्काळ प्राथमिक उपचार करून आवश्यक औषधोपचार केले.

---

## भक्ती-पर्यावरणाच्या संगमात आळंदीत पत्रकार दिन उत्साहात

### माऊलींच्या चरणी नतमस्तक होऊन पादुकापूजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाच्या वतीने 'पत्रकार दिना'चे औचित्य साधत तीर्थक्षेत्र आळंदीत भक्ती, अध्यात्म आणि पर्यावरण रक्षणाचा सुरेख संगम साधण्यात आला. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या पावन चरणी नतमस्तक होत चल पादुकांचे पूजन करण्यात आले, तर श्री संत लीला भूमी सिद्धबेट येथे अजानवृक्षाची पूजा करून वृक्ष संवर्धनाचा संकल्प पत्रकार बांधवांनी यावेळी केला.

सकाळी सात वाजता मंगलमय वातावरणात श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या चल पादुकांचे विधिवत पूजन पार पडले. वेदमूर्ती प्रफुल्ल प्रसादे यांच्या पौरोहित्याखाली वेदमंत्रांच्या जयघोषात हा धार्मिक विधी संपन्न झाला. त्यानंतर श्री गणेश मंदिर मंडप येथे आरती करण्यात आली. यावेळी हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाचे अध्यक्ष अर्जुन मेदनकर, जिल्हा प्रतिनिधी अमर गायकवाड यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. पत्रकार बांधवांनी समाजहितासाठी, लोकशाहीच्या बळकटीसाठी आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेसाठी माऊलींच्या चरणी प्रार्थना करून आशीर्वाद मागितले.

मंदिरातील धार्मिक कार्यक्रमानंतर सकाळी आठ वाजता सर्व पत्रकारांनी श्री संत लीला भूमी सिद्धबेट येथे भेट दिली. येथे पवित्र अजानवृक्षाची पूजा करण्यात आली. सिद्धबेटाची पाहणी करताना पर्यावरण रक्षण, वृक्ष संवर्धन आणि निसर्ग जतन या विषयांवर सखोल चर्चा झाली. पत्रकारिता करताना केवळ बातम्यांपुरते न थांबता सामाजिक उत्तरदायित्व जपण्याचा निर्धार चार वर्षांपूर्वी करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी दिली. त्या अनुषंगाने सिद्धबेट परिसरात वृक्षारोपण, संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या काळात सिद्धबेट परिसरात सुमारे पाच हजार वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला असून त्यासाठी नियोजन व तयारी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. परिसरातील हरित संपदा जतन करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

---

## महाळुंगे पडवळ येथे जिव्हाळा सोशल फाउंडेशनचा तिसरा वार्षिक मेळावा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकारफाटा :** महाळुंगे पडवळ येथील हुतात्मा बाबू गेनू विद्यालयाच्या प्रांगणात जिव्हाळा सोशल फाउंडेशनचा तिसरा वार्षिक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून गावच्या सरपंच सौ. सुजाता चासकर उपस्थित होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून सावरगाव येथील माजी विद्यार्थी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश भागवत यांनी हजेरी लावली.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दत्ता पडवळ यांनी प्रास्ताविकातून मागील दोन वर्षांत राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, माजी विद्यार्थ्यांचा सन्मान, तसेच निसर्ग संवर्धनासाठी वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांमुळे फाउंडेशनची सामाजिक ओळख निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते सुरेश भागवत यांनी आपल्या भाषणातून "कार्यक्रमाला गर्दीपेक्षा समाजासाठी झटणाऱ्या दर्दी कार्यकर्त्यांची गरज असते," असे प्रतिपादन करत जिव्हाळा सोशल फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. अध्यक्षा सौ. सुजाता चासकर यांनी संस्थेच्या सामाजिक कार्याचा गौरव करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

### शाळेची इमारत निष्कासित करण्याचे आदेश

# शिवछत्रपती नगर विकास संस्थेचे बांधकाम बेकायदेशीर ठरले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ शासकीय जमिनीवरील अतिक्रमण सिद्ध; उपविभागीय अधिकाऱ्यांचा कडक निर्णय,

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथे कार्यरत असलेल्या शिवछत्रपती नगर विकास संस्थेने शासकीय जमीन गट क्रमांक ३५५ मध्ये बेकायदेशीर बांधकाम केल्याचा गंभीर आरोप सिद्ध झाला असून, सदर बांधकाम निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले आहेत. या प्रकरणामुळे आळेफाटा परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या संदर्भात राहुल रामदास खोकले यांनी उपविभागीय अधिकारी, जुन्नर–आंबेगाव उपविभाग, मंचर (पुणे) यांच्या न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकेवरील सविस्तर सुनावणीनंतर उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिलेल्या निकालपत्रात संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदार खोकले यांच्या म्हणण्यानुसार, शिवछत्रपती नगर विकास संस्थेने शासकीय जमीन गट नं. ३५५ मध्ये अतिक्रमण करून शाळेची इमारत उभारली आहे. या इमारतीत 'शिवछत्रपती विद्यालय, आळेफाटा' या नावाने इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतचे वर्ग सध्या सुरू आहेत. मात्र या बांधकामासाठी संस्थेने ना बिनशेती परवानगी घेतली आहे, ना जिल्हाधिकारी पुणे तसेच नगररचना व नगरविकास विभागाकडून कोणतीही अधिकृत बांधकाम मंजुरी घेतलेली असल्याचे तपासात आढळून आले आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांनी आदेशात स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४५ अन्वये हे बांधकाम निष्कासित करणे आवश्यक आहे. त्यानुसार दंड आकारणीची कार्यवाही तहसीलदार, जुन्नर यांनी करावी, तसेच बेकायदेशीर बांधकाम तात्काळ काढून टाकण्याची जबाबदारीही तहसीलदारांवर सोपवण्यात आली आहे.

तपासादरम्यान असेही निष्पन्न झाले की, सदर इमारतीचे बांधकाम सुमारे २४ वर्षांपूर्वी करण्यात आले असले, तरी त्या काळातही कोणतीही वैध परवानगी घेण्यात आलेली नव्हती. याशिवाय, संस्थेने इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट केल्याबाबतचे कोणतेही दस्तऐवज चौकशी समितीसमोर सादर केलेले नाहीत. शाळेच्या पाठीमागील बाजूस असलेली सीमा भिंत संस्थेने बांधलेली नसून, ती सार्वी निसर्ग गृहनिर्माण सोसायटीने बांधल्याचे शाळेच्या मुख्याध्यापकांनी लेखी स्वरूपात स्पष्ट केले आहे.

दरम्यान, पिंपळगाव जोगा धरणाचा कालवा शाळेच्या लगतून जात असून, त्याला गळती झाल्याने कालव्याचे पाणी शाळेच्या आवारात येत असल्याची गंभीर बाबही समोर आली आहे. याबाबत संस्थेच्या अध्यक्षांनी १४ डिसेंबर २०२४ रोजी पाटबंधारे विभाग, नारायणगाव (जुन्नर) यांना पत्र देऊन तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. तक्रारदार राहुल खोकले यांनी सांगितले की, या बेकायदेशीर बांधकामामुळे जमिनीचा मूळ उद्देश भंग पावला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षण अधिकारी व पंचायत समिती, जुन्नर यांनी ९ ऑगस्ट २०२५ रोजी शाळेची स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे आळेफाटा परिसरात प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### मौलवीच्या मुलाने बेदरकारपणे गाडी चालवल्याचा गुन्हा

**शहाजहानपूर (उत्तरप्रदेश) :** इत्तेहाद-ए-मिल्लत कौन्सिल (आयएमसी) च्या एका नेत्याच्या मुलाने बेदरकारपणे गाडी चालवून बसला धडक दिल्याबद्दल त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. अपघातानंतर कारमध्ये क्रिस्टल मेथ, एक बेकायदेशीर ड्रग्ज बाळगताना आढळलेल्या फरमान रझा खान (३०) विरुद्ध हा दुसरा एफआयआर आहे. तो आयएमसी प्रमुख मौलाना तौकीर रझा खान यांचा मुलगा आहे, जो गेल्या वर्षी २६ सप्टेंबर रोजी "आय लव्ह मुहम्मद" निदर्शनांदरम्यान बरेलीमध्ये झालेल्या हिंसाचारातील आरोपी आहे.

### 'चायनीज मांज्या'साठी शून्य सहनशीलता

**हैदराबाद** : संक्रांतीच्या सणापूर्वी, पोलिसांनी 'चायनीज मांजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बंदी घातलेल्या कृत्रिम पतंगाच्या दोरीची विक्री, साठवणूक आणि वाहतूक रोखण्यासाठी कडक कारवाई केली आहे आणि १.२४ कोटी रुपयांचा अवैध माल जप्त केला आहे, असे आयुक्त व्ही. सी. सज्जनार यांनी गुरुवारी सांगितले. या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले. हैदराबाद पोलिस या धाग्याच्या बेकायदेशीर विक्रीविरुद्ध कठोर कारवाई करत आहेत.

### सिमलीपालमध्ये शून्य अंश सेल्सिअस

**भुवनेश्वर** : मयूरभंज जिल्ह्यातील सिमिलीपाल राष्ट्रीय उद्यानात गुरुवारी आयएमडीने ओडिशातील अनेक जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट येण्याचा इशारा दिला असला तरी, पारा शून्य अंश सेल्सिअसपर्यंत घसरला. भुवनेश्वरमध्ये किमान तापमान ९.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले जे ३ जानेवारी १९५२ रोजी रात्रीच्या किमान तापमानाशी जुळले, ७४ वर्षांचा जुना विक्रम पुन्हा नोंदवला गेला, असे वरिष्ठ आयएमडी शास्त्रज्ञ यूएस दास यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

## स्वदेशी आत्मघाती ड्रोनसाठी २ हजार कोटींचा प्रकल्प

# भारतीय लष्कर ड्रोन केंद्रित युद्धाकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आधुनिक युद्धपद्धती झपाट्याने बदलत असताना, भारतीय लष्करही नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत ड्रोन-केंद्रित युद्धासाठी सज्ज होत आहे. सीमेपलीकडील शत्रूच्या ठिकाणांवर अचूक आणि कमी वेळेत हल्ले करता यावेत, यासाठी लष्कर लवकरच स्वदेशी आत्मघाती (कामिकाझे) ड्रोनचा मोठा ताफा आपल्या सेवेत दाखल करणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवातीची किंमत सुमारे २,००० कोटी इतकी असल्याचे सांगण्यात येत आहे.

या नव्या धोरणाअंतर्गत लष्करात १५ ते २० विशेष "शक्तीबान" रेजिमेंट तयार करण्यात येणार आहेत. या रेजिमेंटमध्ये झुंड ड्रोन, आत्मघाती ड्रोन आणि लांब पल्ल्याचे मानवरहित विमान (यूएव्ही) यांचा समावेश असेल. या ड्रोनची



कार्यक्षमता ५ किलोमीटरपासून थेट ५०० किलोमीटरपर्यंत असेल, त्यामुळे टॅक्टिकल तसेच स्ट्रॅटेजिक लक्ष्यांवर हल्ले करणे शक्य होणार आहे. याशिवाय, प्रत्येक पायदळ बटालियनमध्ये स्वतंत्र "अश्नी" प्लाटून स्थापन करण्यात येत आहे. या प्लाटूनकडे पूर्णपणे ड्रोन चालवण्याची आणि ऑपरेट करण्याची जबाबदारी असेल. या निर्णयामुळे रणांगणावर थेट सैनिकांच्या जीवाला धोका न आणता अचूक हल्ले करणे शक्य होणार आहे.

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी यासंदर्भात "ईगल ऑन एव्हरी आर्म" ही संकल्पना मांडली आहे. प्रत्येक सैनिक ड्रोन तंत्रज्ञानाशी परिचित आणि सक्षम असावा, तसेच रणांगणावर ड्रोन हे सैनिकाचे डोळे आणि शस्त्र म्हणून वापरले जावेत, असा या संकल्पनेचा उद्देश आहे. लष्कराने ८५० स्वदेशी आत्मघाती ड्रोन खरेदीसाठी जलदगती प्रक्रिया अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. पारंपरिक संरक्षण खरेदी प्रक्रियेला साधारण दोन वर्षे लागू शकतात; मात्र या विशेष प्रक्रियेमुळे काही महिन्यांतच चाचण्या पूर्ण करून ऑर्डर दिली जाणार आहे. खरेदीची ऑर्डर दोन सर्वात कमी दर देणाऱ्या कंपन्यांमध्ये ६०:४० या प्रमाणात विभागली जाणार आहे. हे ड्रोन उच्च पातळीच्या जॅमिंग आणि इलेक्ट्रॉनिक हस्तक्षेप असलेल्या भागातही अचूक लक्ष्य साधू शकतील, अशी त्यांची रचना असेल. त्यामुळे शत्रूच्या तंत्रज्ञानामुळे ड्रोन निष्प्रभ होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

"मेक इन इंडिया" उपक्रमांतर्गत या प्रकल्पात फक्त भारतीय कंपन्यांनाच सहभागी होता येणार आहे. टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स, अदानी डिफेन्स, सोलर डिफेन्स (नागस्त्र ड्रोनची निर्माता कंपनी), न्यूस्पेस रिसर्च अँड टेक्नॉलॉजीज, तसेच निबे डिफेन्स, ए-व्हिजन आणि एसएमपीपी या कंपन्या या स्पर्धेत आघाडीवर असल्याचे मानले जात आहे. या प्रकल्पामुळे देशांतर्गत संरक्षण उद्योगाला मोठा चालना मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या काही वर्षांत भारतीय लष्कराने विविध मोहिमांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर केला आहे. ऑपरेशन सिंदूरसारख्या कारवायांमध्ये ड्रोनच्या मदतीने दहशतवाद्यांचे अड्डे शोधून अचूक हल्ले करण्यात आले. सध्या लष्कराकडे असलेले नागस्त्र-१ सारखे स्वदेशी ड्रोन इस्रायली आणि पोलिश ड्रोनच्या तुलनेत सुमारे ४० टक्के स्वस्त असून कार्यक्षमतेतही सरस ठरले आहेत. लष्कराने २०२६ हे वर्ष "नेटवर्किंग आणि डेटा सेंट्रिक वॉरफेअरचे वर्ष" म्हणून घोषित केले आहे. या कालावधीत कृत्रिम बुद्धिमत्ता, रिअल-टाइम डेटा शेअरिंग आणि स्वयंचलित युद्ध प्रणालींवर विशेष भर दिला जाणार आहे. एकूणच, ड्रोन-केंद्रित युद्धाची ही नवी दिशा भारतीय लष्कराच्या लढाऊ क्षमतेत मोठी वाढ करणारी ठरणार असून, भविष्यातील युद्धांमध्ये तंत्रज्ञानावर आधारित आघाडी घेण्याचा भारताचा निर्धार यातून स्पष्ट होतो.

## सरकारी नोकरीच्या बनावट नियुक्त्यांचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सरकारी नोकऱ्या लावून देण्याच्या आमिषाने उमेदवारांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या संघटित टोळीविरोधात पाटणा येथील अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) व्यापक तपास सुरू केला आहे. या घोटाळ्यात बनावट नियुक्तीपत्रे देऊन सरकारी सेवांमध्ये नोकरी मिळाल्याचा भास निर्माण केला जात असल्याचे उघड झाले आहे.

प्रारंभी हा गैरव्यवहार भारतीय रेल्वेशी संबंधित असल्याचे समोर आले होते. मात्र तपास पुढे जात असताना, या टोळीची व्याप्ती खूपच मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, हे नेटवर्क केवळ रेल्वेपुरते मर्यादित नसून, वन विभाग, रेल्वे भरती मंडळ, भारतीय पोस्ट, आयकर विभाग, उच्च न्यायालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, बिहार सरकारचे विविध खाते, दिल्ली विकास प्राधिकरण (डीडीए) तसेच राजस्थान सचिवालय यांसह ४० पेक्षा अधिक सरकारी संस्था आणि विभागांमध्ये बनावट नियुक्त्या देत होते.

ईडीच्या प्राथमिक तपासात असे आढळून आले आहे की, आरोपी टोळीने सरकारी खात्यांच्या अधिकृत डोमेनसारखी दिसणारी बनावट ई-मेल आयडी तयार केली होती. या ई-मेल खात्यांच्या माध्यमातून उमेदवारांना बनावट जॉइनिंग लेटर पाठवले जात होते. विश्वासार्हता वाढवण्यासाठी, काही पीडितांना प्रत्यक्षात दोन ते तीन महिन्यांचे पगारही देण्यात आले. विशेषतः भारतीय रेल्वेमध्ये रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ), तिकीट तपासनीस (टीटीई) आणि तंत्रज्ञ अशा पदांवर नियुक्ती झाल्याचे दाखवण्यात आले.

ईडीने देशभर एकाचवेळी छापे टाकण्याची कारवाई हाती घेतली आहे. बिहारमध्ये मुझफ्फरपूर येथे एक, मोतीहारी येथे दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे दोन ठिकाणी, केरळमध्ये एर्नाकुलम, पंडालम, अडूर आणि कोडूर या चार ठिकाणी छापे टाकले जात आहेत. याशिवाय तामिळनाडूतील चेन्नई, गुजरातमधील राजकोट आणि उत्तर प्रदेशातील गोरखपूर (दोन), प्रयागराज आणि लखनऊ येथेही छापेमारी सुरू आहे.

## भीतीपोटीच कुत्रे माणसांवर हल्ला करतात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या त्रासावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संजय मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. कुत्रे माणसांमधील भीती ओळखू शकतात आणि त्याच भीतीमुळे ते हल्ला करतात किंवा चावा घेतात, असे निरीक्षण न्यायमूर्ती नाथ यांनी नोंदवले. दुसऱ्या दिवशी अडीच तास सुनावणी पार पडली. शुक्रवारी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी करेल.

कुत्रे माणसांमधील भीती ओळखू शकतात आणि त्याच भीतीमुळे ते हल्ला करतात किंवा चावा घेतात, असे निरीक्षण आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नाथ यांनी नोंदवले. यावेळी प्राणी कल्याण संस्थांच्यावतीने युक्तिवाद करणाऱ्या एका वकिलांनी न्यायमूर्तींच्या या निरीक्षणाशी असहमती दर्शवली. त्यावर न्यायमूर्तींनी स्पष्ट शब्दांत सुनावले की, नकारार्थी मान हलवू नका, मी हे माझ्या वैयक्तिक अनुभवावरून बोलत आहे, असे न्यायमूर्ती नाथ यानी सुनावले.


याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी आकडेवारी सादर करताना सांगितले की, देशात केवळ ५ सरकारी निवारे असून, भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची मोठी कमतरता असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. प्राणी कल्याण संस्थेच्या वतीने बाजू मांडणारे वकील सी.यू. सिंह यांनी कुत्र्यांना त्यांच्या मूळ जागेवरून हटवण्यास किंवा निवाऱ्यात पाठवण्यास विरोध दर्शवला. कुत्रे हटवले तर उंदरांची संख्या वाढेल, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यावर न्यायालयाने मिश्किल टिप्पणी करत विचारले, मग काय उंदीर पकडण्यासाठी आता मांजरी आणायच्या का?, अशी मिश्किल टिप्पणी न्यायालयाने केली.

## चलन पायाभूत सुविधांही भारत होतोय 'आत्मनिर्भर'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या चलन पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, चलनी नोटा छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या उच्च-सुरक्षा कागदाचे उत्पादन वाढवण्यासाठी सरकारने १,८०० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मध्य प्रदेशातील नर्मदापुरम येथील सिक्युरिटी पेपर मिलमध्ये हा कागद तयार केला जाईल.

या प्रकल्पामुळे भारताचे आयात केलेल्या साहित्यावरील अवलंबित्व कमी होईल, मध्य प्रदेशात रोजगार



निर्माण होईल आणि सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत होईल अशी अपेक्षा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी आर्थिक व्यवहारांवरील मंत्रिमंडळ समितीने ही मंजुरी दिली. या प्रकल्पात प्रिंटिंग मिलमध्ये एक नवीन सिलिंड्रिकल मोल्ड वॉटरमार्क बँकनोट लाइन बसवणे समाविष्ट असेल, जी दरवर्षी ६ हजार टन उच्च-गुणवत्तेचा आणि टिकाऊ सुरक्षा कागद तयार करेल.

या विशेष कागदाचा वापर केवळ चलनी नोटा छापण्यासाठीच नाही तर नॉन-ज्युडिशियल स्टॅम्प पेपर्स आणि पासपोर्टसाठी देखील केला जातो. नवीन लाइन १९७० पासून कार्यरत असलेल्या तीन जुन्या उत्पादन लाइनपैकी दोनची जागा घेईल, जे सुविधेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

सिक्युरिटी पेपर मिल ही सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड अंतर्गत काम करते आणि सध्या देशात चलन कागदाच्या उत्पादनात त्यांची मक्तेदारी आहे. आर्थिक वाढ आणि डिजिटल पेमेंटमध्ये वाढ असूनही चलनाचे वाढते परिसंचरण यामुळे, नोटांची मागणी वाढतच आहे, ज्यामुळे अपग्रेड करणे आवश्यक झाले आहे.

उच्च-सुरक्षा कागदात वॉटरमार्क, सुरक्षा धागे आणि विशेष तंतू यांसारखी वैशिष्ट्ये असतात, जी बनावट नोटा रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. नोटाबंदीनंतर, चलनाची मागणी लक्षणीयरीत्या वाढली, ज्यामुळे देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढविण्याची गरज अधोरेखित झाली.

## भारत-बांगलादेश तणावात नव्याने वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** भारत आणि बांगलादेशमधील व्हिसा तणाव वाढला आहे. बांगलादेशने भारतीय नागरिकांसाठी व्हिसा निर्बंध आणखी कठोर केले आहेत, गुरुवारपासून कोलकाता, मुंबई आणि चेन्नई येथील त्यांच्या उपउच्चायुक्तालयांमध्ये व्हिसा सेवांवर निर्बंध लादले आहेत, असे बांगलादेशी वृत्तपत्राने म्हटले आहे.

वृत्तानुसार, बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी रात्री संबंधित मिशनला या निर्णयाची माहिती दिली. मंत्रालयाने व्हिसा सेवांमध्ये कपात करण्यामागे सुरक्षेची कारणे दिली. अलिकडच्या काळात भारत-बांगलादेश संबंध ताणले गेले आहेत, विशेषतः माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्याने.

नवीन प्रणाली अंतर्गत, व्यवसाय आणि रोजगार व्हिसा वगळता सर्व व्हिसा श्रेणी निलंबित करण्यात आल्या आहेत. वृत्तानुसार, कोलकाता येथील बांगलादेश उपउच्चायुक्तालयात कॉन्सुलर आणि व्हिसा सेवा पूर्णपणे निलंबित करण्यात आल्या आहेत. मुंबई आणि चेन्नईमध्येही पर्यटक व्हिसासह व्हिसा सेवा निलंबित करण्यात आल्या आहेत. एका अधिकाऱ्याने वृत्तपत्राला सांगितले की, व्यवसाय आणि रोजगार व्हिसावर प्रक्रिया केली जात आहे.

२२ डिसेंबर रोजी लागू केलेल्या पहिल्या टप्प्यातील निर्बंधांनंतर हा नवीनतम निर्णय घेण्यात आला आहे. त्यावेळी बांगलादेशने नवी दिल्लीतील त्यांच्या उच्चायुक्तालय, अगरतळा (त्रिपुरा) येथील सहाय्यक उच्चायुक्तालय आणि सिलिगुडी येथील व्हिसा सेंटरमधील व्हिसा आणि कॉन्सुलर सेवा निलंबित केल्या होत्या. गुवाहाटी (आसाम) येथील बांगलादेश मिशनमध्येही कॉन्सुलर सेवा निलंबित करण्यात आल्या होत्या. नवीन निर्बंधांमुळे, भारतीय नागरिकांसाठी बांगलादेशी व्हिसा आता अत्यंत मर्यादित श्रेणी आणि निवडक गंतव्यस्थानांपुरते मर्यादित आहेत.

## ममता बनर्जींचा टीएमसीची रणनीती चोरण्याचा आरोप

# ईडी छाप्यांवरून राजकीय वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे बुधवारी मोठा राजकीय गदारोळ पाहायला मिळाला. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) राजकीय सल्लागार संस्था आय-पॅक (आय-पीएसी) शी संबंधित ठिकाणांवर छापेमारी केल्यानंतर वातावरण तापले. या कारवाईवर मुख्यमंत्री ममता बनर्जी यांनी तीव्र प्रतिक्रिया देत केंद्र सरकार आणि तपास यंत्रणांवर तृणमूल काँग्रेसची निवडणूक रणनीती आणि गोपनीय कागदपत्रे मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप केला.

ईडीच्या पथकाने कोलकात्यात दोन महत्त्वाच्या ठिकाणी झडती घेतली. सॉल्ट लेकच्या सेक्टर-पाच मधील गोदरेज वॉटरसाइड इमारतीत असलेल्या आय-पॅकच्या मुख्य कार्यालयावर छापा टाकण्यात आला. त्याचबरोबर आय-पॅकचे वरिष्ठ पदाधिकारी प्रतीक जैन यांच्या निवासस्थानीही तपास करण्यात आला. प्रतीक जैन हे ममता बनर्जींच्या निवडणूक रणनीती आखणाऱ्या मुख्य टीममधील महत्त्वाचे सदस्य मानले जातात.



छापेमारीची माहिती समजताच सॉल्ट लेक येथील आय-पॅक कार्यालयाबाहेर तृणमूल काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले. परिस्थिती तणावपूर्ण होत असल्याने बिधाननगरचे पोलीस आयुक्तही घटनास्थळी पोहोचले. दरम्यान, मुख्यमंत्री ममता बनर्जी स्वतः परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आधी एका ठिकाणी गेल्या आणि त्यानंतर सेक्टर-पाच मधील कार्यालयाकडे रवाना झाल्या.

पत्रकारांशी बोलताना ममता बनर्जी यांनी ही छापेमारी राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला. ईडी आमच्या आयटी कार्यालयात येऊन उमेदवारांची यादी, पक्षाची निवडणूक रणनीती, योजना आणि इतर गोपनीय कागदपत्रे गोळा करण्याचा प्रयत्न करत आहे. हा थेट आमच्या राजकीय तयारीत हस्तक्षेप आहे, असे त्या म्हणाल्या. निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारची कारवाई म्हणजे पक्षावर दबाव आणण्याचा प्रयत्न असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आय-पॅक ही संस्था तृणमूल काँग्रेससाठी निवडणूक प्रचार आणि रणनीती आखण्याचे काम करते. उमेदवार निवड, प्रचाराची दिशा आणि मतदारांशी संवाद या सर्व बाबींमध्ये आय-पॅकच्या भूमिकेला महत्त्व दिले जाते. त्यामुळे निवडणुकीपूर्वी झालेल्या या छापेमारीकडे टीएमसीकडून संशयाने पाहिले जात आहे.

दरम्यान, ईडीकडून या कारवाईमागील नेमके कारण किंवा तपासाचा तपशील अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेला नाही. मात्र या छापेमारीमुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले असून, केंद्र आणि राज्य सरकारमधील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला आहे.

## हादीच्या हत्येशी भारताचा संबंध नाही: हसीना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी उस्मान हादीच्या हत्येवर भारताशी संबंध जोडण्याच्या तेथील मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या आरोपांवर कठोर शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी या आरोपांचे वर्णन बनावट कथानक असे केले असून, स्पष्ट केले की, हे विधान गोंधळात टाकण्याचे तसेच बांगलादेश-भारत दरम्यान दशकांपासून असलेला विश्वास कमी करण्याचे काम करते.

शेख हसीना म्हणाल्या, हादीची हत्या ही एक अत्यंत दुःखद आणि निंदनीय घटना होती. ही घटना नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या काळात बांगलादेशमध्ये घडलेल्या अराजकता आणि निवडणूक हिंसाचाराचा थेट परिणाम होती. हादीच्या हत्येनंतर काही कट्टरपंथीय गटांनी या घटनेचा फायदा आपली विचारसरणी पसरवण्यासाठी, तणाव निर्माण करण्यासाठी आणि अंतरिम सरकारच्या अपयशांवरून लक्ष विचलित करण्यासाठी घेतला. या गटांनी हादीच्या मृत्यूचा उपयोग राजकीय साधन म्हणून केला आणि बांगलादेशच्या लोकशाही संस्थांवर हल्ला करण्याचे प्रयत्न केले, असे त्या म्हणाल्या.

हसीना यांनी भारताशी संबंध जोडण्याच्या आरोपांवरही जोरदारपणे आक्षेप घेतला. त्यांचे म्हणणे आहे की, हा प्रयत्न जाणूनबुजून आणि पूर्णपणे निराधार आहे. कट्टरपंथीय शक्ती बांगलादेशच्या सर्वात जवळच्या मित्राविरुद्ध शत्रुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तसेच देशाच्या हिताचे नुकसान करत आहेत. भारत हा आमचा सर्वात जवळचा मित्र आहे, आणि आमच्या दोन्ही देशांनी अनेक दशकांपासून विश्वासार्ह व्यापार, राजनैतिक आणि धोरणात्मक संबंध टिकवले आहेत, ज्यामुळे क्षेत्रातील स्थिरता सुनिश्चित होते, असेही त्यांनी सांगितले.

शेख हसीना यांनी युनूस सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही टीका केली. शेख हसीना यांनी स्पष्ट केले की, हादीच्या हत्येच्या घटनांना भारताशी जोडण्याचा प्रयत्न केवळ राजकीय तणाव निर्माण करण्याचे साधन आहे आणि हे दोन्ही देशांमधील सुदृढ संबंधांना हानी पोहोचवू शकते.

## अमेठी मतदार यादीत स्मृती इराणींचे नाव

**अमेठी (उत्तर प्रदेश) :** माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचे नाव विशेष सघन सुधारणा प्रक्रियेअंतर्गत अमेठीच्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अमेठीच्या माजी खासदाराने गौरीगंज विधानसभा मतदारसंघातील मेदान मवाई गावातून मतदार म्हणून नोंदणी केली आहे, जिथे त्यांनी घर बांधले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत इराणी यांची याच गावातील मतदार म्हणून नोंदणी झाली होती आणि त्यांनी त्यांचा मतदानाचा हक्कही बजावला होता.

## तामिळनाडूतील जनतेला डीएमके सरकारची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** निवडणुकीच्या वर्षात, तामिळनाडूतील द्रमुक सरकारने पोंगल सणापूर्वी राज्यातील जनतेला एक महत्त्वाची भेट दिली आहे. मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी गुरुवारी चेन्नईतील नजरथपेट्टई याठिकाणी अलंदूर परिसरातील एका रेशन दुकानातून पोंगल गिफ्ट हॅम्पर वितरण योजनेची औपचारिक सुरुवात केली. या योजनेअंतर्गत, राज्यातील २.२ कोटी रेशनकार्डधारक कुटुंबांना ३,००० रुपयांच्या रोख मदतीसह पोंगल गिफ्ट पॅक मिळेल. सरकारला ६,००० कोटींपेक्षा जास्त खर्च येईल.

सरकारी अधिकाऱ्यांच्या मते, प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला एक किलो तांदूळ, एक किलो साखर, एक ऊस आणि ३,००० रुपयांची रोख रक्कम मिळेल. वितरण प्रक्रिया गुरुवारी राज्यभर सुरू झाली. लाभार्थ्यांना त्यांच्या नियुक्त वेळेनुसार जवळच्या रेशन दुकानांमधून पोंगल पॅक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सहकार, अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने सांगितले की, योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे. सर्व रेशन दुकानांना तांदूळ आणि साखरेचा पुरवठा करण्यात आला आहे. पुरवठा ५० ते ८० टक्के पूर्ण झाला आहे. उर्वरित लवकरच जिल्हा प्रशासनामार्फत पोहोचवला जाईल जेणेकरून सर्व लाभार्थ्यांना वेळेवर लाभ मिळू शकेल, असे सांगण्यात आले आहे.

## न्यायाधीश वर्मा यांना उत्तरासाठी मुदतवाढ देण्यास नकार

# महाभियोग प्रस्तावावरील निकाल न्यायालयाने राखला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्षांनी त्यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावावर चौकशी समिती स्थापन करण्यास मान्यता दिल्याने प्रक्रियात्मक त्रुटी असल्याचा आरोप करणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला आहे.

दोन दिवसांच्या सुनावणीनंतर, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने गुरुवारी (८ जानेवारी) आपला निर्णय राखून ठेवला. तथापि, न्यायमूर्ती वर्मा यांना संसदीय समितीसमोर उत्तर दाखल



करण्यासाठी मुदतवाढ देण्यास खंडपीठाने नकार दिला. ते १२ जानेवारी रोजी संसदीय समितीसमोर उत्तर दाखल करणार आहेत.

या याचिकेत न्यायमूर्ती वर्मा यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या संसदीय समितीच्या वैधतेला आव्हान दिले. त्यांनी म्हटले की त्यांना काढून टाकण्याचा प्रस्ताव राज्यसभेच्या उपसभापतींनी फेटाळला. न्यायमूर्ती वर्मा यांनी त्यांच्या याचिकेत असा युक्तिवाद केला की जेव्हा संसदेच्या दोन्ही सभागृहात एकाच दिवशी महाभियोगाचा प्रस्ताव मांडला जातो तेव्हा दोन्ही सभागृहांनी तो प्रस्ताव स्वीकारून संयुक्त समिती स्थापन करणे आवश्यक असते जेणेकरून तो प्रस्ताव पुढे नेता येईल. त्यांच्या प्रकरणात न्यायमूर्ती वर्मा यांनी असा युक्तिवाद केला की राज्यसभेच्या उपसभापतींनी हा प्रस्ताव फेटाळल्यामुळे, न्यायाधीश चौकशी कायद्यानुसार लोकसभा अध्यक्षांनी स्थापन केलेली चौकशी समिती अयोग्य ठरली आहे.

बुधवारी, सर्वोच्च न्यायालयाने संसदेच्या वरिष्ठ सभागृह राज्यसभेत महाभियोग प्रस्ताव फेटाळला गेला आणि त्याच दिवशी लोकसभेत तोच प्रस्ताव स्वीकारला गेला तर तो पराभूत कसा मानला जाऊ शकतो, असे प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या महाभियोगासाठी लोकसभेने स्वीकारलेला प्रस्ताव पराभूत मानला जावा, या कल्पनेवर सर्वोच्च न्यायालयाने शंका व्यक्त केली. १४ मार्च २०२५ रोजी न्यायमूर्ती वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी आग लागली होती. यावेळी अग्निशमन विभागाने मोठ्या प्रमाणात अर्धवट जळालेली रोकड जप्त केली. या घटनेनंतर त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावण्यात आले. परिणामी, त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यांची अंतर्गत समिती स्थापन केली. चौकशीत असे निष्कर्ष काढण्यात आले की न्यायमूर्ती वर्मा यांचे रोख रकमेवर नियंत्रण होते आणि गैरवर्तनात ते दोषी आढळले. महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याची शिफारस सरन्यायाधीशांनी केली होती.

तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना शिफारस केली की न्यायमूर्ती वर्मा यांना पदावरून काढून टाकण्यासाठी महाभियोग प्रक्रिया सुरू करावी. दरम्यान, जुलै २०२५ मध्ये न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग प्रक्रिया सुरू झाली, जेव्हा १४० हून अधिक लोकसभा खासदारांनी त्यांना काढून टाकण्याची मागणी करणारा प्रस्ताव मांडला. १२ ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी चौकशी समिती स्थापन केली. पन्नास खासदारांनी राज्यसभेतही असाच प्रस्ताव मांडला.